दै. प्रजावाणी दि. 07/08/24

# दरोड्याच्या गुन्ह्यातील तीन आरोपींना अटक; हिमायतनगर पोलिसांची कामगिरी

**वार्ताहर • हिमायतनगर**

हिमायतनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत काहीं महिन्यापूर्वी दरोड्याचे गुन्हे घडले होते. या गुन्ह्यातील हवे असलेल्या तीन आरोपीस पोलिसांनी मोठ्या शिताफीने पकडून अटक केली आहे. हि कारवाई शनिवार दि. ३ रोजी करण्यात आली.

या अशा स्वरूपाच्या फिर्यादीवरून अज्ञात आरोपीविरुद्ध जबरी चोरीचा गुन्हा नोंदविण्यात आला होता. यासह अन्य रोड रॉबरीच्या गुन्हयातील आरोपीचा शोध हिमायतनगर पोलीस घेत होते. दरम्यान शनिवारी गुप्त माहितीवरून व तांत्रिक पद्धतीने पोलीसांनी तपास करीत बोरगडी रोड व पळसपूर टि पॉईन्ट येथून आरोपी लखन विनोद पिंपळे वय २३ वर्ष रा. विठ्ठलवाडी हिमायतनगर, कुणाल उर्फ विक्की वैजनाथ बोडावार वय २४ वर्ष रा. दत्तनगर नांदेड, विजय तुकाराम अडबलवाड वय २५ वर्ष रा. तरोडा बु. नांदेड या तीन आरोपीस पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली असून गुन्हयात वापरलेला चाकू व रोख रक्कम ४ हजार दोनशे रूपये पोलिसांनी जप्त केले आहेत. हि कारवाई पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक खंडेराव धरणे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॅनियल बेन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अमोल भगत, महिला पोलीस उपनिरीक्षक निता कदम, मसपोउपनि कोमल कागणे, पोहेकॉ श्याम नागरगोजे, पोना. पवन चौदंते यांनी ही उल्लेखनीय कामगिरी केली आहे.



हिमायतनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत नॅशनल हायवेवर सरसम जवळ फिर्यादी प्रल्हाद भाऊराव मिराशे यांची मोटारसायकल अडवून अँड्राईड मोबाईल नगदी रक्कम एकूण मुद्देमाल असा २५ हजार रूपयांचा मुद्देमाल चोरला होता. व तसेच पोटा बु. जवळील मनिषा आश्रम शाळेजवळ एका मुलाचा मोबाईल फोन नगदी रक्कम एकूण ३५ हजार रूपयांचा मुद्देमाल चोरीला गेला होता.